# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक ता. २५ सप्टेंबर २०१९</u>

# नवरात्र आणि गरबा उत्सवातून करणार प्लास्टिकबंदीबाबत जनजागृती

## आयुक्त अभिजीत बांगर : स्वच्छ भारत अभियान तयारीचा घेतला आढावा

**नागपूर, ता. २४ :** पुढील काही दिवसांत सुरू होणारा नवरात्र उत्सव आणि त्यानिमित्त शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर करण्यात येणारे गरब्याचे आयोजन लक्षात घेता तेथे एकत्रित होणाऱ्या नागरिकांना नागपूर महानगरपालिका प्लास्टिकबंदीचा संदेश देणार आहे. प्लास्टिकबंदीबाबत जनजागृती करत नागरिकांनी यासाठी स्वत: पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात येणार असल्याची माहिती मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

स्वच्छ भारत अभियानासंदर्भात सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मनपा मुख्यालयातील आयुक्त सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, स्वच्छ भारत अभियानाचे नोडल अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी, सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटच्या लिना बुधे उपस्थित होते.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या स्वच्छता सप्ताहासंदर्भात बोलताना ते म्हणाले, झोनस्तरावर जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात यावे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत नागपूर शहराची निवड देशातील निवडक शहरांमध्ये करण्यात आली आहे. या शहरांमध्ये प्लास्टिक कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी २ ऑक्टोबरला ‘प्लॉग रन’चे आयोजन करण्याचे प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर महानगरपालिका परिसराला ‘सिंगल यूज प्लास्टिक मुक्त’ करण्याचे निर्देश देत अन्य सरकारी कार्यालयांनाही ‘सिंगल यूज प्लास्टिक’चा उपयोग बंद करून अभियानात सहभागी होण्याचे आवाहन आयुक्त अभिजीत बांगर यांनी यावेळी केले.

प्लास्टिकऐवजी पर्यायी व्यवस्थेला प्रोत्साहन देण्याची सुचवित आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले, यासाठी प्लास्टिकला पर्याय असलेल्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी महिला बचत गटांना प्रोत्साहित करायला हवे. या बचत गटांना शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि मॉलशी जोडले जाईल जेणेकरून उत्पादनाची विक्री होईल आणि प्लास्टिकचा उपयोग बंद करणे शक्य

होईल. अशा उत्पादनांची एक प्रदर्शनी आयोजित करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

मनपाद्वारा संचालित शाळांमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे आणि बचत गटांच्या माध्यमातून प्लास्टिक संकलित करण्यासाठी एक मोहिम सुरू करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले. मंगल कार्यालय आणि कॅटरिंग संचालकांची एक बैठक लवकरच आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. बैठकीला सर्व सहायक आयुक्त तथा स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

.......................................................................................................................

# नवरात्रि व गरबा मंडलों से प्लास्टिक उपयोग बंद करने मुहिम चलाएगी मनपा

## आयुक्त ने स्वच्छ भारत अभियान की तैयारियों की समीक्षा की

नागपुर : नागपुर महानगर पालिका नवरात्रि व गरबा मंडलों के माध्यम से स्वच्छता का संदेश प्रसारित कर जनजागृति करेगी। मनपा आयुक्त श्री अभिजीत बांगर ने स्वच्छ भारत अभियान संबंधी तैयारियों की एक बैठक को संबोधित करते हुए कहा कि धार्मिक पर्व के दौरान बड़ी संख्या में लोग नवरात्रि पंडालों में देवी दर्शन करने व गरबा खेलने जाते हैं । इस अवसर का उपयोग जनजागृति के लिए किया जा सकता है।

मनपा मुख्यालय में आयोजित स्वच्छ भारत अभियान संबंधी बैठक में अतिरिक्त आयुक्त श्री रविन्द्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त श्री राम जोशी, उपायुक्त डा रंजना लाडे, स्वास्थ्य अधिकारी डा

प्रदीप दासरवार, डा सुनील कांबले व कौस्तुभ चटर्जी, ग्रीन विजिल फाउंडेशन तथा सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट की लीना बुधे उपस्थित थे।

मनपा आयुक्त श्री अभिजीत बांगर ने महात्मा गाँधी जी की 150 वी जन्म जयंती पर मनाए जाने वाले स्वच्छता सप्ताह के संबंध में कहा कि जोनल स्तर जागरूकता रैलियों का आयोजन किया जाना चाहिए । केन्द्र सरकार के स्वच्छ भारत अभियान के तहत नागपुर शहर का चयन देश के चुनिंदा शहरों में किया गया है जहां प्लास्टिक कचरा व्यवस्थापन हेतु plog run का आयोजन 2 अक्टूबर को करना है। आयुक्त ने मनपा परिसर को सिंगल यूज प्लास्टिक मुक्त करने का निर्देश देते हुए अन्य सरकारी कार्यालयों से भी सिंगल यूज प्लास्टिक का उपयोग बंद कर अभियान में सहयोग करने का आग्रह किया ।
प्लास्टिक के बदले पर्यायी व्यवस्था को बढ़ावा देने का सुझाव देते हुए अभिजीत बांगर ने कहा कि महिलाओं के बचत गटो को प्रोत्साहित करना चाहिए ताकि वे प्लास्टिक के विकल्प का उत्पादन कर सकें । इन बचत गटो को शापिंग काम्पलैक्स व माल से जोड़ा जाएगा ताकि उनके उत्पादों की बिक्री हो व प्लास्टिक का उपयोग बंद करने में सफलता मिले। इन उत्पादों की एक प्रदर्शनी भी आयोजित करने का निर्देश उन्होंने दिया ।
मनपा शालाओ में जनजागृति कार्यक्रम आयोजित करने व बचत गटो के माध्यम से प्लास्टिक संकलित करने एक अभियान छेड़ने का भी निर्देश दिया । उन्होंने मंगल कार्यालय व केटरिंग संचालकों की बैठक आयोजित करने का निर्देश दिया । बैठक में सभी सहायक आयुक्त व एन जी ओ के प्रतिनिधि भी उपस्थित थे ।